**ठळक बातम्या**

- गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी गव्हाच्या साठ्याची माहिती दर आठवड्याला वेबसाइटवर देण्याचे केंद्र सरकारचे सर्व व्यापाऱ्यांना आदेश

- पहिल्या टप्प्यासाठी राज्यातल्या पाच लोकसभा मतदारसंघात १८१ पैकी ११० उमेदवारांचे अर्ज वैध

- देशातल्या प्रमुख आठ उद्योगांच्या एकत्रित निर्देशांकात गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी फेब्रुवारीत ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढ

**आणि**

- रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्डेनची जोडी मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत

**<><><><><><>**

गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी सरकारनं सर्व छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांना गव्हाचा साठा जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. किरकोळ आणि घाऊक विक्रेते, मॉल, रिटेल चेन आणि प्रक्रिया करणाऱ्यांना हे साठे १ एप्रिलपासून evegoils.nic.in/wheat या वेबसाइटवर नमूद करावे लागतील. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत दर शुक्रवारी साठ्यांची माहिती अपडेट करावी लागणार आहे. नोंदणी न केलेल्यांना या वेबसाइटवर नोंदणी करुन साठ्याची माहिती द्यावी लागेल. सध्या तांदळाच्या साठ्याची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यासाठी पाच मतदारसंघात १८१ पैकी ११० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. नागपुरात ५३ पैकी २६, भंडारा-गोंदियामध्ये ४० पैकी २२, गडचिरोली-चिमूरमध्ये १२ पैकी १२, चंद्रपूरमध्ये ३५ पैकी १५ आणि रामटेकमध्ये ४१ पैकी ३५ उमेदवारी अर्ज वैध ठरले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या टप्प्यासाठी उद्यापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. या मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होईल.

रामटेक लोकसभा मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरलं आहे. या जागेवर त्यांचे पती श्यामकुमार बर्वे काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार राहणार आहेत.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरात विविध क्षेत्रांमध्ये डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची नितांत आवश्यकता असून असून गावागावांमध्ये डिजीटल सुविधा पोहचवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं मायक्रोसॉफ्ट चे संस्थापक बिल गेटस यांच्यासोबत झालेल्या चर्चेत सांगितलं. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयचा वापर योग्य प्रशिक्षणासह केला तर त्याचा फायदा होईल, नाहीतर गैरवापर होण्याची शक्यता जास्त आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. सध्याच्या काळात डेटा सुरक्षा महत्वाची चिंता असून भारतात कायदेशीर चौकटीअंतर्गत डेटा सुरक्षित असला तरीही जनजागृती महत्वाची आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि युक्रेनचे परराष्ट्र मंत्री दिमित्रो कुलेबा यांच्यात आज नवी दिल्लीत बैठक होणार आहे. दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय

भागीदारी आणि प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर परस्पर सहकार्याबाबत चर्चा होईल. परराष्ट्र मंत्र्यांच्या निमंत्रणावरून युक्रेनचे परराष्ट्र मंत्री कालपासून दोन दिवस भारताच्या दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

दूरसंचार विभागानं खोट्या कॉल संदर्भात एक मार्गदर्शक सूचना जारी केली आहे. दूरसंचार विभागाच्या नावानं नागरिकांना त्यांचे मोबाईल नंबर बंद केले जातील अशा धमक्या असणारे खोटे कॉल येत असल्याचं दूरसंचार विभागानं म्हटलं आहे. परदेशी मोबाइल नंबरवरून येणाऱ्या फसव्या व्हॉट्सॲप कॉलबद्दल दूरसंचार विभागानं लोकांना जागरूक केलं आहे. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणूक करण्यासाठी गुन्हेगार अशा कॉलद्वारे वैयक्तिक माहिती चोरण्याचा प्रयत्न करत असून दूरसंचार विभागाकडून असे कॉल केले जात नसल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

देशातल्या प्रमुख आठ उद्योगांच्या एकत्रित निर्देशांकात गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी फेब्रुवारीत ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढ झाली आहे. यावर्षी फेब्रुवारीत कोळसा, नैसर्गिक वायू, सिमेंट, पोलाद, कच्चं तेल, वीज, रिफायनरी या क्षेत्रातल्या उत्पादनांमध्ये वाढ नोंदवली गेली. फेब्रुवारी २०२३ च्या तुलनेत या वर्षी फेब्रुवारी मध्ये सिमेंट उत्पादनात १० पूर्णांक २ दशांश टक्के कोळशाच्या उत्पादनात ११ पूर्णांक ६ दशांश टक्के, कच्च्या तेलाच्या उत्पादनात ७ पूर्णांक ९ दशांश टक्के, वीज निर्मितीत ६ पूर्णांक ३ दशांश टक्के, नैसर्गिक वायूच्या उत्पादनात ११ पूर्णांक ३ दशांश टक्के, पेट्रोलियम रिफायनरी उत्पादनात २ पूर्णांक ६ दशांश टक्के आणि स्टील उत्पादनात ८ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ झाली. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या फेब्रुवारीमध्ये खतांच्या उत्पादनात ९ पूर्णांक ५ दशांश टक्क्यांनी घट झाली आहे.

**<><><><><>**

भारतीय हवाई दलाच्या ‘तेजस Mk1A’ या कमी वजनाच्या लढाऊ विमानानं काल बंगळुरू इथल्या हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या केंद्रावरून पहिलं यशस्वी उड्डाण केलं. ‘तेजस’ श्रेणीमधलं हे विमान अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक रडार, युद्ध सामुग्री, दूरसंवाद प्रणाली आणि लढाऊ क्षमतांनी सुसज्ज आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात अटकेत असलेले मुख्तार अन्सारी यांचा बांदा मेडिकल कॉलेज रूग्णालयात काल रात्री हृदयविकाराच्या झटक्यानं मृत्यू झाला. ६३ वर्षीय मुख्तार अन्सारी मऊ सदर या मतदारसंघातून पाच वेळा माजी आमदार होते. तसंच ६० हून अधिक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये गुंतलेले असल्यामुळं २००५ पासून ते तुरूंगात होते. अन्सारीच्या मृत्यूनंतर राज्यात कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे.

**<><><><><>**

आज प्रभू येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचा दिवस म्हणजेच गुड फ्रायडे आहे. इस्टर संडेच्या आधी येणारा शुक्रवार गुड फ्रायडे असतो. यानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुड फ्रायडेच्या दिवशी येशू ख्रिस्ताच्या बलिदानाचे स्मरण केलं आहे.

**<><><><><>**

उत्तर सीरियातल्या अलेप्पो शहरावर आज पहाटे झालेल्या इस्त्रायली हल्ल्यात लेबनीज सशस्त्र गट हिजबुल्लाहच्या पाच सदस्यांसह ३८ जण ठार झाले. या हवाई हल्ल्यांनी अलेप्पोच्या ग्रामीण भागातल्या अनेक भागांना लक्ष्य केलं असून या हल्ल्यांमध्ये अनेक नागरिक आणि सैनिक मारले गेल्याचं सीरियाच्या संरक्षण मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><><>

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू एबडेन या जोडीनं पुरुष दुहेरीची अंतिम फेरी गाठली आहे. त्यांनी स्पेनच्या मार्सेल ग्रॅनोलर्स आणि अर्जेंटिनाच्या होरासिओ झेबालोस यांचा ६-१, ६-४ असा पराभव केला. अंतिम फेरीत या जोडीचा सामना  उद्या अमेरिकेच्या ऑस्टिन क्रॅजिसेक आणि क्रोएशियाचा इव्हान डोडिग यांच्याशी होणार आहे.

<><><><><>

माद्रिद स्पेन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.तिनं चायनीज तैपेईच्या हुआंग यू हसनवर  २१-१४, २१-१२ असा सहज विजय मिळवला. उपांत्यपूर्व फेरीत  सिंधूचा  पुढील सामना आज थायलंडच्या सुपानिदा काटेथोंगशी होणार आहे.

तर पुरुष दुहेरीत ध्रुव कपिला आणि एम.आर. अर्जुन या भारतीय जोडीनं स्कॉटिश जोडी सी. ग्रिमले आणि एम. ग्रिमली यांचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शेवटच्या आठ सामन्यात त्यांची लढत मलेशियाच्या जे. आरिफ आणि आर.के. याप यांच्याशी होईल.

महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रॅस्टो या जोडीनं टिफनी हो आणि ग्रोन्या सोमरविले जोडीचा २१-१४, २१-८ असा पराभव केला.तर  मिश्र दुहेरीत एन सिक्की रेड्डी आणि बी सुमीत रेड्डी या आणखी एका भारतीय जोडीनं अमेरिकेच्या एलिसन ली आणि प्रेस्ली स्मिथ यांचा २२-२०,२१-१८ असा पराभव केला.

<><><><><>

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं दिल्ली कॅपिटल्सचा १२ धावांनी पराभव केला. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. राजस्थान रॉयल्सनं २० षटकांत ५ गडी गमावून १८५ धावा केल्या. मात्र प्रत्युत्तर देताना दिल्ली कॅपिटल्सला ५ विकेट्सवर १७३ धावाच करता आल्या.

**<><><><><><>**

माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षीताई पाटील यांचं  आज सकाळी अल्पशा आजारानं  निधन झालं. त्या ७६ वर्षांच्या होत्या. आज दुपारी  पेझारी इथे  त्यांच्या पार्थिवावर  अंत्यसंस्कार होणार आहेत.  मीनाक्षी पाटील यांनी दोन वेळा अलिबाग विधानसभा मतदार संघाचं प्रतिनिधित्व  केलं होतं. मुख्यमंत्री  विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात त्या राज्यमंत्री होत्या. मीनाक्षीताई पाटील या  रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या  दीर्घकाळ अध्यक्ष होत्या.

**//<><><><><><>//**